**जमिनीची मशागत व रानबांधणी :-** उन्हाळी हंगामात जमिनीची चांगली नांगरट करावी. किंवा नांगरट ही खरिप / रब्बी चे पिकांची काढणी झालेवर डिसेंबर, जानेवारी मध्ये (हिवाळी) करावी त्यावेळी जमिनीत ओलावा असतो. उन्हाळ्यात नांगरट केल्यास जमिन पूर्णपणे कोरडी असते, खूप ढेकळे निघतात. नंतर २/३ कुळवाचे पाळ्या देऊन जमिन भुसभशीत करून उन्हात तापू द्यावी. ज्यामुळे हानीकारक किडींचे कोष, बुरशीचा नायनाट होऊन जमिनीस विश्रांती मिळेल.

बिगर हंगामी लागवडीसाठी म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये लागवड करावयाची असेल तर खरिपामध्ये मूग, उडीद, कांदा पिक काढणी झाल्यानंतर जमिन तयार करावी. मशागत करताना ओल्या, वाफसा नसलेल्या जमिनीस मशागत करू नये. जमिन चांगली कोरडी झालेवर मशागत करावी. जेणेकरून खूप ढेकळे निघणार नाहीत तसेच पूर्वीचे पिकांचे अवशेष कुजून जातील व ऑक्टोबर हिट मध्ये जमिन चांगली तापेल व हानीकारक बुरशी, किडींचे कोष नष्ट होतील. लागवडीपूर्वी शेतात बेसल डोस व शेणखत समप्रमाणात मिसळून बेड तयार करावेत.

कलिंगड पिकाची लागवड ही 5-6 फूट X 1.25 फूट अंतरावर करावयाची असल्याने या पिकाचे बेड 2.5 फूट रूंद व 15 सेमी उंचीचे तयार करावे. त्यावर इनलाईन लॅटरल मधोमध अंथरून घ्यावे व 4 फूट रूंदीचा प्लॅस्टीक मल्चिंग पेपर टाकावा. मल्चिंग पेपरचे बेडचे बाजूस / खाली आलेला संपूर्ण भाग / मातीने बुजवून घ्यावा. मल्चिंग पेपरमध्ये हवेच्या पोकळ्या राहणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यानंतर तो 4/8 दिवस तसाच ठेवून जमिन तापू द्यावी.

**कलिंगडाचे पिकाचे प्रचलित वाण :-**

कलिंगडाचे बाजारात खाजगी बियाणे उत्पादकांचे भरपूर वाण आहेत. वाणाची निवड करत असताना लागवडीसाठी निवडलेला हंगाम, कोणत्या बाजारात फळ विक्री करावयाची आहेत, आपला स्वत:चा अनुभव, ईतर शेतकऱ्यांचे अनुभव, बियाणे उत्पादक व विक्री करणारे प्रतिनिधी, उत्पादकाचे अधिकृत वेबसाईट वरील माहिती इ. चा विचार करून वाणाची निवड करावी.
खाली काही शेतकऱ्यांचे पसंतीचे वाणाबाबत माहिती दिलेली आहे.

**कलिंगड पिकाचे वाण :-**

1) **सिम्बा (सिंजेंटा) :-** लवकर तयार होणारा, फळाचा आकार उभट गोल, दंडगोलाकार, सालीचा रंग काळपट गर्द हिरवा, फळाचे वजन 3-4 किलो, गर आकर्षक गोल, जोमदार वाढ, दूरच्या वाहतूकीसाठी व साठवणक्षमता चांगला असलेला वाण.
2) **ब्लॅक बॉस (इंडस सिड्स) :-** अंडाकार फळ, फळाचे वजन 3-5 किलो, 75-80 दिवसात तयार होते. मध्यम गोड, आकर्षक, चकाकी असलेले फळ, यास बाजारभाव चांगला मिळतो. मध्यम साठवणक्षमता.
3) **सुपर क्विन (सिंजेंटा) :-** रोगास सहनशिल, 5-6 किलो वजनाचे फळधारणा चांगली होते, गर लाल, कुरकुरीत, साखरेचे प्रमाण 12-14%, साल गडद हिरवी, लांबचे वाहतूकीसाठी चांगला, साठवणक्षमता उत्कृष्ट.
4) **मॅक्स (BASF) :-** उन्हाळी हंगामासाठी योग्य, उच्च उत्पादनक्षमता, 2-8 किलो वजनाचे फळ, 60-70 दिवसात तयार होतो, बाजारात चांगली मागणी, अतिशय गोड व रूचकर चव.
5) **बाहूबली (सिमोंस) :-** जोमदार वाढणारा, लवकर तयार होणारा वाण, लांबचे वाहतूकीसाठी उत्तम, टिकवणक्षमता चांगली. मोझॅक व फ्युजारिम मरसाठी सहनशील, 65-70 दिवसात तयार होतो. सरासरी 3-6 किलो वजनाचे फळ, फळाचा रंग गडद काळा - चमकदार, अंडाकृती आकाराचे फळ 15 ते 16% साखरेचे प्रमाण हिवाळी / आगाप लागवडीसाठी चांगला वाण.

6) **सागर किंग (सुपर सिड्स) :-** अंडाकृती आकाराचे फळ, फळाचे वजन, 2-6 किलो, किड / रोगास सहनशिल, 70-75 दिवसात तयार होतो.
7) **सुपर किंग (सिंजेंटा) :-** रोगास सहनशील, 2-10 किलो वजनाचे फळ, सर्वाधिक लागवडीखालील वाण, अंडाकृती फळ, सर्वात जास्त गोड, साखरेचे प्रमाण जास्त.
8) **मेलोडी (कलश सिड्स) :-** हिवाळी हंगामासाठी, म्हणजेच आगाप लागवडीसाठी चांगला, बाजारात चांगली मागणी, 70-75 दिवसात तयार होतो, फळाचा आकार अंडाकार, 2-5 किलो वजनाचे फळ, टिकवणक्षमता चांगली, दूरचे वाहतूकीसाठी योग्य.
9) **ऑगष्टा (सिंजेंटा) :-** गोलाकार फळ, 85-90 दिवसात तयार होते, साखरेचे प्रमाण 11-12%, साठवणक्षमता चांगली, दूरचे वाहतूकीसाठी योग्य.

तसेच नोव्हेंबर / डिसेंबर चे आगाप लागवडीसाठी विजय, झिग्रा, वाण चांगले आहेत. ब्लॅक अव्हेन्यू, रेड बेबी (ॲग्रोस्टार), आयेशा (नुनहेम्स), सुगरपॅक (सेमानीस) ई. वाण शेतकऱ्यांमध्ये प्रचलित आहे.

## ❖ रोपवाटीका :-

कलिंगड पिकांची लागवड बिया टोकून किंवा रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करून ती 18-20 दिवसांची झालेवर प्रत्यक्ष शेतावर केली जाते. त्यासाठी आपण निवडलेल्या वाणांची रोपवाटिका धारकांस रोपांची आगावू नोंदणी करावी. वेळोवळी रोपवाटिकेस भेट देऊन आपली रोपांची वाढ व काळजी घेतली जात आहे का त्याबाबत खात्री करून घ्यावी. रोपवाटिका ही उच्च गुणवत्तेची निकष पाळत आहे का ? याबाबत माहिती घेवून खात्रीचे, विश्‍वासू रोपवाटिकेतूनच रोपे खरेदी करावीत.



शक्यतो कलिंगड पिकांची रोपे रोपवाटिकेत तयार करून घ्यावीत. स्वत: रोपे तयार करण्याचे कौशल्य व त्यासाठी लागणारे ज्ञान व सुविधा यांचा विचार केल्यास स्वत: रोपे तयार करण्याऐवजी रोपवाटिकेतून रोपे विकत घेतल्यास उच्च गुणवत्तेची, सशक्त व निरोगी रोपे किफायतशीर दरामध्ये मिळतात किंवा शेतकरी वर नमूद केले प्रमाणे प्रत्यक्ष पिक टोकण करून लागवड करू शकतात.

